CMYK

खाद्यपदार्थ विक्रेत्यांनी अन्न सुरक्षा व स्वच्छतेला प्राधान्य द्यावे - केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव >> पान 2

बदलापुरात मित्राचा मित्राच्या पत्नीवर अतिप्रसंग; संतापलेल्या पतीने केली मित्राचा केला खून >> पान 3

आरोग्य सेवा शेवटच्या घटकापर्यंत पोचविण्यासाठी केंद्र व राज्य शासन कटिबद्ध - प्रतापराव जाधव >> पान 4

**सुविचार**

आदर्श मूल्ये असलेली व्यक्ती समाजाचा आधारस्तंभ बनते.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 153 ■ मंगळवार, दि. 14 जानेवारी 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




कोट्यवधी भाविकांच्या गर्दीत The Kerala Story फेम अभिनेत्रीचं लाइव्ह शिव तांडव स्तोत्रम पठण, तयारी सुरु

आतील पान

## शक्तिपीठ महामार्गाचे काम सुरु करावे - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस


### सार्वजनिक बांधकाम विभागाच्या आगामी १०० दिवस कामांच्या आराखड्याचा आढावा

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई/प्रतिनिधी : राज्यातील दळणवळण सुविधा तसेच व्यावसायिक संधी आणि पर्यटनाला गती देणाऱ्या शासनाच्या महत्वाकांक्षी शक्तिपीठ महामार्गाच्या कामाचे नियोजन सर्वांना विश्र्वासात घेऊन तत्परतेने सुरु करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संबंधितांना दिले.**

सह्याद्री अतिथीगृह येथे आगामी शंभर दिवसात सार्वजनिक बांधकाम विभागाने करावयाच्या कामकाजाचा आढावा मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी घेतला. बैठकीस सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, पर्यटन मंत्री शंभूराज देसाई, राज्यमंत्री इंद्रनील नाईक, मेघना साकोरे बोर्डीकर, मुख्य सचिव सुजाता सौनिक, यांच्यासह सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अपर मुख्य सचिव मनिषा म्हैसकर, सचिव सदाशिव साळुंखे (रस्ते), सचिव संजय दशपुते (बांधकामे), महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक अनिल गायकवाड आदी उपस्थित होते.



मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी राज्यातील महामार्गाची उभारणी आणि रस्त्यांचे जाळे दर्जेदार आणि अधिक व्यापक करण्याच्या दृष्टीने सार्वजनिक बांधकाम विभागाने नियोजन करण्याचे सूचित करुन सांगितले की, राज्यातील धार्मिक स्थळांना जोडणाऱ्या आणि पर्यटन उद्योगाला प्रोत्साहन देणाऱ्या शक्तीपीठ महामार्गाची उभारणी दर्जेदार आणि गतिमानतेने करावयची असून सर्वांना विश्वासात घेऊन त्यासाठीची प्रक्रिया सुरु करण्याचे निर्देश मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी दिले.

समृद्धी महामार्गाचे उर्वरित अंतिम टप्प्याचे आमणेपर्यंतचे ७६ कि.मी. काम तत्परतेने पूर्ण करुन फेब्रुवारीपर्यंत हा महामार्ग पूर्णपणे खुला करावा. तसेच यावर्षी समृद्धी महामार्गाचे कर्जरोखे प्रक्रिया पूर्ण करण्यात यावी. प्रवाशांना उपयुक्त ठरणाऱ्या मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील १३.३० कि.मी. मिसिंग लिंकचे कामही गतीने पूर्णत्वास न्यावे. नाशिक- मुंबई या राष्ट्रीय महामार्गाची सुधारणा करण्याचे काम ही तातडीने पूर्ण करावे. मंत्रालय परिसरात नवीन सात मजली इमारतीची उभारणी कामाची सुरुवात करण्यात यावी.

सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत कामांची गुणवत्ता तपासण्याची जबाबदारी संबंधितांकडून योग्यरित्या पार पाडली जाणे आवश्यक असून त्याचे नियंत्रण करणारी यंत्रणा विभागाने कार्यान्वित करावी. विभागाच्या आर्थिक सक्षमतेसाठी नियोजन विभागाच्या निर्देशानुसार आर्थिक प्रारुप तयार करावे. रस्त्यांच्या निर्मितीसाठी भूसंपादन प्रक्रिया शासनाने करुन रस्त्याचे काम बीओटी तत्वावर करण्याचे धोरण स्वीकारावे. विविध विभागांच्या बांधकामांसंदर्भात केंद्रीय कार्यपद्धती अंमलात आणणे गरजेचे आहे. त्यासाठी बांधकाम विभागातच संबंधित विभागांच्या बांधकामासाठीचा स्वतंत्र कक्ष तयार करण्यात येईल. रस्त्यांच्या दुर्तफा वृक्ष लागवड करताना भविष्यातील रस्ता विस्तारीकरणाची निकड लक्षात घेऊन वृक्षसंगोपन करणात यावे. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन दर्जेदार आणि गतिमान कामे करण्याच्या दृष्टीने नियोजन करण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले.

सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी विभागामार्फत गुणवत्तापूर्ण आणि गतिमानतेने काम करण्यास प्राधान्य देण्यात येणार असून विभागाच्या कार्यपद्धतीत पारदर्शकता आणि कालमर्यादा प्रामुख्याने पाळण्यात येणार असल्याचे सांगितले. तसेच महामार्गावर प्रवाशांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध असण्यावर, प्राधान्याने महिला प्रवाशांसाठी प्रसाधनगृहांची सुविधा उपलब्ध करण्यावर भर देण्यात येणार असल्याचे सांगितले.

विभागाच्या अपर मुख्य सचिव श्रीमती म्हैसकर यांनी विभागाच्या आगामी शंभर दिवसांच्या नियोजनाबाबत माहिती देताना कार्यक्षमता, गुणवत्ता, पारदर्शकता याला प्राधान्य देत विभागाच्या माध्यमातून येत्या शंभर दिवसांत विविधांगी महत्त्व पूर्ण प्रकल्प पूर्णत्वास नेण्यात येणार असून विभागाच्या बळकटीकरणाच्या दृष्टीने राबवण्यात येणा-या कामांची सविस्तर माहिती दिली.

## भारताच्या प्राचीन धार्मिक परंपरेचा निदर्शक महा कुंभ म्हणजे धार्मिक आस्था आणि समरसतेचा उत्सव : प्रधानमंत्री

दिल्ली,: महाकुंभ म्हणजे भारताच्या शाश्वत आध्यात्मिक परंपरेचे प्रतीक आणि श्रद्धा व सौहार्द यांचा उत्सव: पंतप्रधान

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रयागराज येथे सुरू होणाऱ्या महाकुंभ २०२५ च्या शुभारंभानिमित्त सर्वांना शुभेच्छा दिल्या आहेत. 'भारतीय मूल्ये आणि संस्कृती जोपासणाऱ्या कोट्यवधी लोकांसाठी हा एक अतिशय खास दिवस आहे. महाकुंभ हा भारताच्या शाश्वत आध्यात्मिक परंपरेचे प्रतीक असून श्रद्धा व सौहार्द यांचा उत्सव आहे' असे मोदी यांनी म्हटले आहे .

पंतप्रधानांनी एक्स या समाजमाध्यमावर लिहिले आहे,

''भारतीय मूल्ये आणि संस्कृती जोपासणाऱ्या कोट्यवधी लोकांसाठी आजचा एक अतिशय खास दिवस !

प्रयागराज येथे महाकुंभ २०२५ चा प्रारंभ होत असून, श्रद्धा, भक्ती आणि संस्कृतीच्या पवित्र संगमासाठी असंख्य लोक एकत्र येत आहेत. महाकुंभ भारताच्या शाश्वत आध्यात्मिक परंपरेचे प्रतीक असून श्रद्धा व सौहार्द यांचा उत्सव साजरा करत आहे .''

''प्रयागराज इथे कोट्यवधी भारतीय पवित्र स्नान करण्यासाठी व देवतांचे आशीर्वाद घेण्यासाठी जमलेले पाहून मला अतिशय आनंद होत आहे. सर्व यात्रेकरू व पर्यटकांचा येथील निवास सुखद होण्यासाठी माझ्या शुभेच्छा!''

## मुंबईत १२ व्या मजल्यावरुन खाली कोसळून २० वर्षीय तरुणाचा मृत्यू

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबईच्या अंधेरी परिसरात एक तरुण इमारतीच्या १२ व्या मजल्यावरून कोसळल्याची घटना घडली आहे. मेट्रो स्टेशन खाली इमारतीचं बांधकाम सुरू असताना २० वर्षीय तरुण इमारतीच्या १२ व्या मजल्यावरून खाली कोसळला असून त्याचा जागीच मृत्यू झाला आहे.या घटनेची दखल पोलिसांनी घेतली असून ही हत्या आहे की आत्महत्या याचा तपास पोलीस करत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, शदाप (वय २०) असं मृत्यू झालेल्या तरुणाचं नाव आहे. ही घटना मुंबईच्या अंधेरी पूर्व परिसरातील जेबी नगर परिसरात घडली आहे. जे.बी नगर मेट्रो स्टेशन खाली सहार प्लाझाच्या शेजारी नवीन इमारतीचं बांधकाम सुरू आहे. रविवारी सायंकाळी सहा वाजता तो इमारतीच्या १२ व्या मजल्यावर काम करत होता.अचानक तो इमारतीच्या १२व्या मजल्यावरून खाली कोसळला. या दुर्घटनेत शदापचा जागीच मृत्यू झाला आहे. तो या इमारतीमध्ये इलेक्ट्रिक सुपरवायझर म्हणून काम करत होता. इमारतीत काम करणाऱ्या इतर कामगारांनी तातडीनं घटनास्थळी धाव घेतली. पण तोपर्यत त्याचा मृत्यू झाला होता. या घटनेची माहिती मिळतच एमआयडीसी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. घटनास्थळाचा पंचनामा केल्यानंतर पोलिसांनी शदाबचा मृतदेह शवविच्छेदनासाठी कूपर रुग्णालयात पाठवला. या घटनेचा पोलीस अधिक तपास करत आहेत.

## १५ वर्षीय मुलाने पिकअप चालवत दोघांना चिरडले

**ठाणे/प्रतिनिधी :** १८ वर्षाखालील मुलांच्या हातात गाडी देऊ नका असे सतत आवाहन पोलीस करत असतात. तरीही पालकांनी आपल्या पाल्याच्या हातात गाडी दिल्यास पालकांवर गुन्हा दाखल होतो. असे असूनही असे अनेक प्रकार आजूबाजूला घडत आहेत. असाच एक प्रकार ठाण्यात घडला आहे. ठाण्यात १५ वर्षाच्या मुलाने २ रिक्षांना उडवल्याचा भीषण प्रकार घडला आहे. यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

ठाण्यातील घोडबंदर आनंद नगर येथे मध्यरात्री १५ वर्षाच्या मुलाने पिकअप चालवत रिक्षाला धडक दिली. रिक्षाला धडक देऊन १५ वर्षीय मुलगा चालवत असलेले पिकअप खड्ड्यात पडले. मेट्रोच्या कामानिमित रस्त्याच्या बाजूला खोदलेल्या खड्ड्यामध्ये पडून हा अपघात झाला. या अपघातात एकाचा जागीच मृत्यू झाला तर एकाची प्रकृती गंभीर असून त्याच्यावर ठाणे जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याप्रकरणी कासारवडवली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर मुलाच्या आईवडिलांनाही पोलिसांनी ताब्यात घेतल्याची माहिती मिळाली आहे.




## पंतप्रधान मोदी १५ जानेवारी रोजी महाराष्ट्र दौऱ्यावर!

### 'या' तीन युद्धनौकांचे करणार लोकार्पण

दिल्ली,: पंतप्रधान नरेंद्र मोदी हे येत्या १५ जानेवारी रोजी महाराष्ट्र दौऱ्यावर येणार आहेत. या दौऱ्यामध्ये पंतप्रधान वेगवेगळ्या कार्यक्रमांना हजेरी लावणार आहेत. ज्यामध्ये नौदलाच्या तीन युद्धनौकांचे लोकार्पण पंतप्रधानांच्या हस्ते केले जाईल. तसेच नवी मुंबईतील एका इस्कॉन मंदिराचे उद्घाटन देखील पंतप्रधान मोदी करणार आहेत.

१५ जानेवारी रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी हे सकाळी सुमारे १० वाजून ३० मिनिटांनी मुंबईच्या नौदल गोदीत आय एन एस सुरत, आय एन एस निलगिरी व आय एन एस वाघशीर या नौदल युद्धनौकांचे राष्ट्रार्पण करतील. त्यानंतर दुपारी सुमारे साडेतीन वाजता ते नवी मुंबईतील खारघर येथील इस्कॉन मंदिराचे उद्घाटन करतील .

तीन युद्धनौकांमध्ये काय आहे खास?



तीन प्रमुख नौदल लढाऊ जहाजे कार्यरत करणे ही संरक्षण उत्पादन आणि सागरी सुरक्षेच्या क्षेत्रामध्ये जागतिक नेतृत्व करण्याच्या भारताच्या दृष्टीकोनातून घेतलेली एक उत्तुंग झेप असणार आहे. आयएनएस सूरत, झ१५इ हे मार्गदर्शित क्षेपणास्त्र विनाशक प्रकल्पातील चौथे आणि सर्वोत्तम जहाज असून, जगातील सर्वात मोठ्या आणि सर्वात अत्याधुनिक विनाशकांपैकी एक आहे. यातील ७५ टक्के सामग्री स्वदेशी असून अत्याधुनिक शस्त्र-सेन्सर पॅकेजेस आणि प्रगत नेटवर्क-केंद्रित क्षमतांनी ते सुसज्ज आहे. आयएनएस निलगिरी, हे झ१७अ स्टेल्थ फ्रिगेट प्रकारातील पहिले जहाज असून भारतीय नौदलाच्या युद्धनौका डिझाईन विभागाने त्याची निर्मिती केली आहे तसेच त्यात उत्कृष्टपणे संकटकाळी तग धरून रहाण्याची क्षमता असून सागरी सुरक्षा (सीकीपिंग) आणि स्टील्थसाठी प्रगत वैशिष्ट्ये समाविष्ट केली आहेत, जे स्वदेशी फ्रिगेट्सच्या आधुनिक प्रकाराचे प्रतिबिंब दर्शवितात. आयएनएस वाघशीर, झ७५ स्कॉर्पीन प्रकल्पाची सहावी आणि अंतिम प्रकारातील पाणबुडी असून, पाणबुडी बांधणीतील भारताच्या वाढत्या कौशल्याचे ती प्रतिनिधित्व करते. फ्रान्स नौदलाच्या समूहाच्या सहकार्याने तिची बांधणी करण्यात आली आहे.

इस्कॉन मंदिराचेही होणार उद्घाटन

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे या दौऱ्या दरम्यान उद्या श्री श्री राधा मदनमोहनजी मंदिर, खारघर, नवी मुंबई येथील इस्कॉन प्रकल्पाचेही उद्घाटन करतील. नऊ एकरांवर वसलेल्या या प्रकल्पात अनेक देवदेवतांची मंदिरे, वैदिक शिक्षणाचे केंद्र, प्रस्तावित वस्तुसंग्रहालय, सभागृह, आणि उपचार केंद्र यांचा समावेश आहे. विश्वबंधुत्व, शांतता आणि सौहार्द वाढवणे हे वैदिक शिक्षण केंद्राचे उद्दिष्ट आहे.

## मुंबईत पालिकेची रुग्णालये सलाईनवर! १२० कोटींची बिले थकल्याने औषधांचा पुरवठा होणार बंद

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** बृहन्मुंबई महानगरपालिके अंतर्गत येणाऱ्या रुग्णालयांना आणि दवाखान्यांना औषधांचा पुरवठा करणाऱ्या १५० हून अधिक पुरवठादारांनी आजपासून (१३ जानेवारी) औषधांचा पुरवठा बंद करण्याचा निर्णय जाहीर केला आहे. मागील चार महिन्यांपासून १२० कोटी रुपयांची बिले थकवल्याने हा निर्णय घेण्यात आल्याचे ऑल फूड अँड ड्रग्स लायसन्स होल्डर फाउंडेशनचे म्हणणे आहे. त्यामुळे याचा परिणाम पालिके अंतर्गत येणाऱ्या रुग्णालयांमधील औषध पुरवठ्यावर होणार आहे.

मुंबईची सार्वजनिक रुग्णालयांची आरोग्य व्यवस्था ही अत्यावश्यक औषधांसाठी १५० हून अधिक औषध आणि अन्य सुविधा पुरवठादारांवर अवलंबून आहे. केईएम, सायन आणि कूपर, नायरसारखी पालिका रुग्णालये दररोज हजारो रुग्णांना सेवा देतात. या रुग्णालयांमध्ये केवळ मुंबईतीलच नाहीतर मुंबई बाहेरूनदेखील हजारो रुग्ण उपचारासाठी येत असतात. या सर्व औषध पुरवठादारांनी महापालिकेकडून थकीत बिले मिळेपर्यत औषधांचा पुरवठा केला जाणार नसल्याचा निर्णय घेतला. त्यामुळे रुग्णांना औषधांसाठी तारेवरची कसरत करण्याची वेळ येण्याची शक्यता आहे.

## जिल्ह्यातील दुसरा सौर प्रकल्प कार्यान्वित

### बोरी सौर प्रकल्पामुळे ८३० शेतकऱ्यांना मिळणार दिवसा वीज

### प्रकल्प पुर्तीसाठी जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांचे विशेष प्रयत्न

दैनिक आपला विदर्भ





**बुलढाणा/प्रतिनिधी :** मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत जिल्ह्यात ७ मेगावॅट क्षमता असलेला मेहकर तालुक्यातील बोरी सौर प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला आहे. या प्रकल्पामुळे ३३ के.व्ही. उखळी उपकेंद्राअंतर्गत ८३० शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठ्याची सोय झाली आहे. तथापि पळशी बुद्रूक येथील ५ मेगावॅट सौर प्रकल्प सुरु झाल्यामुळे त्या प्रकल्पातून परिसरातील ७०० शेतकऱ्यांना दिवसा वीज मिळत असल्याची माहिती महावितरण प्रशासनाने दिले आहे.

शेतकऱ्यांना सिंचनासाठी दिवसा, अखंडित व भरवशाचा वीज पुरवठा करण्यासाठी राज्यात राबविण्यात येत असलेल्या मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत जिल्ह्यात ६७ विकेंद्रीत सौर प्रकल्पातून ५२ उपकेंद्रासाठी १९६ मेगावॅट वीज निर्मित करण्यात येणार आहे. त्यातील पळशी बुद्रूक आणि बोरी असे दोन प्रकल्प सुरू झाले आहे.त्यामुळे या दोन प्रकल्पातून १ हजार ५३० शेतकऱ्यांना त्यांच्या सोयीनुसार आणि दिवसा वीज द्यायला सुरूवात झाली आहे. जिल्ह्यातील बोरी सौर प्रकल्प पूर्ण करण्याच्या दृष्टिने जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्याकडून विशेष प्रयत्न करण्यात आले.

मेघा इंजिनिअरींग (MEIL) या विकासकाच्या माध्यमातून पूर्ण करण्यात आलेला मेहकर तालुक्यातील बोरी हा सौर प्रकल्प ७ मे.वॅ.क्षमतेचा असून ३५ एकर शासकीय जमिनीवर उभारण्यात आला आहे. तसेच २५ एकर शासकीय जमिनीवर उभारण्यात आलेला बुलडाणा तालुक्यातील पळशी बुद्रूक येथील प्रकल्प ५ मे.वॅ.क्षमतेचा असल्याची माहिती महावितरण प्रशासनाने दिली.

CMYK

## तिळगुळ घ्या... गोड गोड बोला...!

भारतीय संस्कृतीत सणांना अतिशय महत्व आहे. प्रत्येक सण विशिष्ट असा संदेश देत असतो. या सणातून एक वेगळीच प्रेरणा मिळत असते. मकर संक्रात हा त्यापैकीच एक सण. मकर संक्रात हा वर्षातील पहिला सण त्यामुळे या सणाचा उत्साह काही निराळाच असतो. मकर संक्रांत हा सण संपूर्ण देशात वेगवेगळ्या नावाने आणि वेगवेगळ्या पद्धतीने साजरा केला जातो. आपल्या महाराष्ट्रात तर या सणाला खूप महत्व दिले जाते. मकर संक्राती म्हणजे सूर्याने मकर राशीत प्रवेश करणे. सूर्य ज्या दिवशी दक्षीयणातून उत्तरायणात मार्गक्रमण करतो त्या तिथीला मकर संक्रांत साजरी केली जाते. ही तिथी कधी १४ जानेवारीला येते तर कधी १५ जानेवारीला येते. यावर्षी ही तिथी १४ जानेवारीला आली आहे. संक्रात ऐन थंडीत येते त्यामुळे हवेत गारवा असतो त्याचा परिणाम आपल्या प्रकृतीवर होतो. त्यामुळे या दिवसात शरीराला उष्ण ठेवण्यासाठी उष्ण पदार्थ खाल्ले जातात. तीळ आणि गूळ यात उष्मांक अधिक प्रमाणात असतो. कदाचित त्यामुळेच मकर संक्रांतीच्या दिवशी तिळगुळ वाटला जातो. संक्रातीच्या दिवशी तीळ आणि गूळ यांच्या वड्या किंवा लाडू एकमेकांना देण्याची पद्धत आहे. तिळगुळ देताना तिळगुळ घ्या गोड गोड बोला असा संदेशही दिला जातो. एकमेकांविषयी स्निग्धता देणारे तीळ आणि गोडवा देणारा गूळ एकत्र आल्याने प्रेमाचे नाते टिकते असे प्रतिकात्मक रूपही या सणाला आहे. एकमेकांशी असलेली कटुता भांडण विसरून एकत्र येण्याचा संदेश देणारा हा सण आहे. मकर संक्रातील विवाहित स्त्रिया एकमेकांना हळदी कुंकू लावून सौभाग्याचे वान देतात. हे सर्व करण्यामागे कोणतीही रूढी परंपरा नसून नव्याने स्वागत आणि त्यातून आनंद घेणे हा आहे. पूर्वी स्त्रियांना एकत्र येण्याची संधी क्वचितच मिळत असे या सणानिमित्त महिला एकत्र येत असे. आजच्या धकाधकीच्या जीवनातही महिलांना एकत्र येण्याची संधी क्वचितच मिळते त्यामुळे संक्रातीनिमित्त मिळणारी ही आयती संधी महिलावर्ग सोडत नाहीत. मकर संक्रांत हा सण महिलांचा सण असे मानले जात असले तरी लहान मुलेही या सणाची आतुरतेनं वाट पाहत असतात. मकर संक्रांतीच्या दिवशी पतंग उडवण्याची परंपरा आहे. अनेक गावात पतंगोत्सव आयोजित केला जातो. या दिवशी आकाशात विविध रंगांची, आकाराची पतंगे उडताना दिसतात. पतंगाचे विविध आकार रंग पाहून मन प्रसन्न होते. एकमेकांशी असलेली कटुता विसरून प्रेमाने वागा असा संदेश देणारी मकर संक्रात म्हणजे आनंदाची पर्वणीच. मकर संक्रांतीच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा! तिळगुळ घ्या गोड गोड बोला!

# खाद्यपदार्थ विक्रेत्यांनी अन्न सुरक्षा व स्वच्छतेला प्राधान्य द्यावे - केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** आज देशात २१ लाखांहून अधिक खाद्यपदार्थ हाताळणाऱ्यांना प्रशिक्षित करण्यात आले आहे ज्यात २.५१ लाखांहून अधिक स्ट्रीट फूड विक्रेते आहेत. देशभरातील सुमारे ९० लाख बचत गटांशी (डक्क) संबंधित १० कोटींहून अधिक महिलांना अन्न सुरक्षा प्रशिक्षण कार्यक्रमांद्वारे सक्षम आणि जागरूक करण्याच काम केल्या जात आहे असे प्रतिपादन केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी केले भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरण पश्र्चिम क्षेत्रमार्फत येथील सहकार विद्या मंदिर शाळेच्या सभागृहात 'संकल्प स्वच्छ आहार' उपक्रमांतर्गत खाद्यपदार्थ विक्रेत्यांसाठी प्रशिक्षण व जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरण पश्र्चिम क्षेत्राच्या संचालक प्रिती चौधरी, दिल्ली मुख्यालयाचे संचालक डॉ. रविंद्र सिंग, आयुष विभागाचे प्रा. डॉ. योगेश शिंदे, भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाचे सहायक संचालक ज्योती हरणे, स. संचालक अजय खैरनार, निलेश धंदाळे, शुभांगी निकम आदी उपस्थित होते.

केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव म्हणाले की, बुलढाणा जिल्ह्याला धार्मिक व ऐतिहासिक स्थळांचा वारसा लाभला आहे. या ठिकाणाला अनेक देशी व विदेशी पर्यटक भेटी देतात. त्यांना स्थानिक खाद्यपदार्थांचे मोठे आकर्षण असते. त्यामुळे या खाद्यपदार्थांची मोठी मागणी होत असून स्थानिकांना त्याचा लाभ होतो. पर्यटक अन्न सुरक्षा व स्वच्छतेला प्राधान्य देतात. त्यामुळे प्रत्येक विक्रेत्यांनी स्वच्छता, सुरक्षतेकडे अधिक लक्ष दिले पाहिजे. प्रशिक्षणामध्ये सांगितलेल्या बाबींचा आपल्या व्यवसायात अवलंब करुन अन्न सुरक्षा मानकाचे पालन करावे.




जिल्ह्यातील अनेक खाद्यपदार्थांचे नावलौकीक असून शेगांव कचोरीप्रमाणे नवनवीन प्रयोगातून पदार्थांची ब्रँडींग करावी. खाद्यपदार्थ विक्रेत्यांसाठी शासन अनेक योजना राबवित आहे. स्वनिधी योजनाच्या माध्यमातून अल्प दरात कर्ज उपलब्ध करुन दिला जातो. या योजनेचा लाभ घेऊन खाद्यपदार्थ विक्रेत्यांनी आपला व्यवसाय मोठा करावा. त्यांनी खाद्यपदार्थ तयार करण्यापर्यंत सिमीत न राहता त्यांचे पॅकींग, मार्केटींग व ब्रँडींगवर भर द्यावा. भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाव्दारे देशभरात खाद्यपदार्थ विक्रेत्यांसाठी प्रशिक्षण व जनजागृती कार्यक्रम राबवित आहे. या प्रशिक्षणाचा जिल्ह्यातील सर्व बचत गट, रस्त्यावरील खाद्यपदार्थ विक्रेत्यांनी लाभ घेऊन ग्राहकांना सुरक्षित, स्वच्छ व दर्जेदार खाद्यपदार्थ उपलब्ध करुन द्यावे. जंक फुडमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. त्यामुळे नागरिक पौष्टिक व सात्वीक आहाराला प्राधान्य देत असून केंद्र शासनही आयुष आहाराला प्रोत्साहन देत आहे. आयुष आहारामुळे विविध आजारांपासून बचाव होत असून शारीरिक, मानसिक स्वास्थासाठी आवश्यक आहे. त्यामुळे खाद्यपदार्थ विक्रेते व बचत गटांनी आयुष आहाराला प्राधान्य देऊन जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न करावा, असे आवाहन केंद्रीय राज्यमंत्री श्री. जाधव यांनी केले. बचत गटांच्या माध्यमातून ग्रामीण भारतामध्ये अन्न सुरक्षा आणि निरोगी खाण्याच्या सवयींना प्रोत्साहन देण्यासाठी सर्वांगीण प्रयत्न केले जात असल्याचे त्यांनी सांगीतले रस्त्यावरील खाद्य पदार्थ हे भारताच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचे एक जिवंत उदाहरण असून प्रत्येक वर्गातील व्यक्ती आवडीने खातात. खाद्यप्रेमी अन्न सुरक्षा, स्वच्छता व पौष्टिक पदार्थांना प्राधान्य देत आहे. त्यामुळे खाद्यपदार्थ विक्रेत्यांनी अन्न सुरक्षा व स्वच्छतेला प्राधान्य द्यावे, असे आवाहन केंद्रीय आयुष, आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला दीप प्रज्वलन करुन खाद्यपदार्थ विक्रेतांचे प्रशिक्षण व जनजागृती कार्यक्रमाचे उद्घाटन केले. त्यानंतर राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेच पुजन करुन अभिवादन करण्यात आले. प्रशिक्षणाला आलेले विक्रेते व बचत गटातील महिलांना केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते सेफ्टी किटचे वाटप करुन उपस्थितांना अन्न सुरक्षा व स्वच्छतेसंदर्भात प्रतिज्ञा दिली.

भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाचे फोस्टॅक प्रशिक्षक डॉ. रामेश्र्वर जाजू व प्रियंका सूर्यवंशी यांनी वैयक्तिक स्वच्छता, सुरक्षित अन्न हाताळणी, अन्न भेसळ आणि अन्न सुरक्षा व स्वच्छता मानके याविषयी सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरण पश्र्चिम क्षेत्राचे संचालक प्रिती चौधरी यांनी केले. तर सूत्रसंचालन सहायक संचालक अजय खैरनार यांनी केले. यावेळी बचत गटाच्या महिला व रस्त्यावर खाद्यपदार्थ विकणारे २००० पेक्षा जास्त विक्रेते सहभागी झाले होते.

## पुण्याच्या फर्ग्युसन रोडवर वाल्मिक कराडची प्रॉपर्टी, एकाच बिल्डिंगमध्ये सहा अलिशान ऑफिस, आता ईडीची एन्ट्री होणार?

दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी :** परळी आणि बीडमम ध्ये गुन्हेगारी मार्गाने कमावलेल्या पैशातून वाल्मिक कराड आणि त्याच्या टोळीने राज्यातील वेगवेगळ्या शहरांत कोट्यवधी रुपयांच्या मालमत्ता खरेदी केल्याचा आरोप होत आहे. त्यातूनच पुण्यातील फर्ग्युसन महाविद्यालयाच्या समोर असलेल्या इमारतीत वाल्मिक कराड आणि टोळीने २५ कोटी रुपये खर्चून सहा ऑफिस स्पेसेस विकत घेतल्याचा दावा करण्यात येतोय . त्यातूनच आता या प्रकरणात ईडीची एंट्री होऊ शकते अशी चर्चा सुरु झाली आहे



पुण्यातील फर्ग्युसन महाविद्यालयाच्या बरोबर समोर काम सुरु असलेल्या असलेल्या एका इमारतीत वाल्मिक कराड, त्याच्याशी संबंधित एक महिला आणि विष्णू चाटेच्या नावे सहा ऑफिस स्पेसेस बुक करण्यात आल्या आहेत.पंचवीस कोटी रुपये मोजून वाल्मिक कराड आणि त्याच्या टोळीने या इमारतीत या ऑफिस स्पेसेस खरेदी करण्यासाठी बिल्डरसोबत करार केल्याचं समोर आलं आहे.

इमारतीचं काम पूर्ण झालं की त्यांच्याम ध्ये खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण होणार होता. मात्र त्याआधीच संतोष देशमुख यांच्या हत्येमुळे वाल्मिक कराड आणि टोळीभोवती आरोपांचं वादळ उठलं आणि त्यातून या टोळीच्या आर्थिक व्यवहारांची पाळेमुळे खणून काढली जात आहेत.

दहशतीला पैशाचं पाठबळ

वाल्मिक कराड आणि टोळीच्या वर्चस्वाला जसा दहशतीचा आधार आहे तसाच या दहशतीतून निर्माण झालेल्या पैशातून या टोळीने राज्यभरात जे उद्योग आणि धंदे सुरु केलेत त्यातून मिळणाऱ्या पैशांचं पाठबळ आहे. म्हणून दहशतीचं हे वर्चस्व मोडून काढायचं असेल तर या अशा आर्थिक स्रोतांवर देखील कारवाई व्हायला हवी. त्यातूनच ईडी अर्थात एन्फोर्सम ेंट डिरेक्टरेटच्या कारवाईची चर्चा सुरु झाली आहे.

घरकाम करणारा पोऱ्या ते कोट्यवधींचा मालक

भाजपचे दिवंगत नेते गोपीनाथ मुंडेंकडे घरकाम करणारा पोऱ्या म्हणून वाल्मिक कराडने कामाला सुरुवात केली. पुढच्या काळात धनंजय मुंडेंचा अतिशय विश्वासू म्हणून तो ओळखला जाऊ लागला. सत्तेच्या या जवळीकीचा उपयोग करत वाल्मिक कराड आणि त्याच्या टोळीने कोट्यवधी रुपयांची म ाया जमवली. याच पैशांच्या आधारे पुण्या-म ुंबईसह अनेक शहरांमध्ये वाल्मिक कराड आणि टोळीने उद्योग आणि व्यवसायांमध्ये पैसे गुंतवल्याचा आरोप होत आहे.

वाल्मिक कराड मकोकाच्या बाहेर

संतोष देशमुख यांच्या हत्येचा आरोप असलेल्या आठ जणांवर मकोका कायद्याअंतर्गत कारवाई करण्यात येणार आहे. मात्र वाल्मिक कराडला मकोकाच्या कारवाईतून वगळण्यात आलं. वाल्मिक कराड आणि टोळीची दहशत कायमस्वरूपी संपवायची असेल तर त्यांच्या या अशा आर्थिक स्तोत्रांवर कारवाई होण्याची गरज आहे. त्यातूनच ईडीकत्रडे या टोळीच्या म ालमत्तांचा तपास सोपवला जाऊ शकतो असे बोलले जातेय.

दरडोई उत्पन्नाच्या बाबतीत बीडचा क्रमांक बराच खालचा आहे. पिढ्यानपिढ्या ऊसतोडणी करणाऱ्या मजुरांचा जिल्हा म्हणून बीड ओळखला जातोय. इतक्या वर्षात या ऊसतोड मजुरांच्या आयुष्यात फारसा बदल झालेला नाही. मात्र त्यांचं नेतृत्व करत असल्याचा दावा करणाऱ्यांची संपत्ती ही अशी गगनाला भिडल्याचं चित्र मात्र दिसून येत आहे.

## कोट्यवधी भाविकांच्या गर्दीत The Kerala Story फेम अभिनेत्रीचं लाइव्ह शिव तांडव स्तोत्रम पठण, तयारी सुरु

'द केरला स्टोरी' या वादग्रस्त चित्रपटाने रातोरात लोकप्रिय झालेली अदा शर्मा महाकुंभ मेळा २०२५ मध्ये लाइव्ह परफॉर्मन्स देणार आहे. त्यासाठी ती तयारीही करत आहे. या भव्य आध्यात्मिक मेळाव्यात ती लाइव्ह शिव तांडव स्तोत्रमचे पठण करणार आहे. १३ जानेवारी ते २६ फेब्रुवारी दरम्यान महाशिवरात्रीला महाकुंभमेळ्याची सांगता होईल. यावर्षी अनेक सेलिब्रिटी या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याची शक्यता आहे, त्यातील एक म्हणजे अदा शर्मा. अदा स्वतः ला शिवभक्त मानते.

महाकुंभातील भाविकांच्या गर्दीत अदा शर्माचा पहिला परफॉर्मन्स असेल. तत्पूर्वी, तिने शिव तांडव स्तोत्रम्चे उत्कृष्ट पठण करून चाहत्यांना आश्र्चर्यचकित केले होते. त्याचा व्हिडिओही वेगाने व्हायरल झाला होता. अदा ही एक धार्मिक अभिनेत्री आहे, ती अनेकदा पूजा करताना आणि भजने गाताना दिसते.

अदा शर्मा पहिल्यांदाच महाकुंभमेळ्याला जात असल्याने तिच्यासाठी हे आणखीनच खास असणार आहे. लॉकडाऊननंतर अदा शर्माने स्वतःचे शिव तांडव स्तोत्रम गातानाचा व्हिडिओ शेअर केले आहेत. चाहत्यांनी हा व्हिडिओ खूप लाईक आणि शेअर केला आहे. २०२४ मध्ये एका कार्यक्रमात तिने संपूर्ण स्तोत्रम लाईव्ह सादर केले.

अदा शर्माने तिच्या इंस्टाग्रामवर या परफॉर्मन्सची एक क्लिप देखील पोस्ट केली होती, ज्यामध्ये ती भगवान शिवाच्या लोकप्रिय नटराज स्वरूपाप्रमाणे एका पायावर संतुलन ठेवताना दिसते, जी तिची भक्ती दर्शवते. अदा शर्मा ही एक प्रतिभावान बॉलीवूड अभिनेत्री आहे जिने २००८ मध्ये '१९२०' या हिट हॉरर चित्रपटाद्वारे तिच्या करिअरची सुरुवात केली.

## '...तर तुमच्या खात्यात १ लाख रुपये जमा होतील', तरुण ब्राह्मण दांपत्यांना जाहीर ऑफर

लखनऊ : मध्य प्रदेशातील तरुण ब्राह्मण दांपत्यांना सरकारकडून एक ऑफर देण्यात आली आहे. मध्य प्रदेश सरकारच्या एका मंडळाच्या प्रमुखांनी चार मुले जन्माला घालण्याचा निर्णय घेणाऱ्या तरुण ब्राह्मण जोडप्यांना १ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले आहे. पंडित विष्णू राजोरिया हे परशुराम कल्याण मंडळाचे अध्यक्ष आहेत आणि त्यांना राज्य कॅबिनेट मंत्रीपदाचा दर्जा आहे.

भोपाळमधील एका कार्यक्रमात बोलताना विष्णी राजोरिया यांनी आपण आपल्या कुटुंबांवर लक्ष केंद्रित करणे थांबवल्यामुळे 'धर्मविरोधी' लोकांची संख्या वाढत आहे असं विधान केलं आहे. ''मला तरुणांकडून फार आशा आहे. आपण ज्येष्ठांकडून फार अपेक्षा करु शकत नाही. तुम्ही हे नीट ऐका. तुम्ही आपल्या भविष्यातील पिढीसाठी जबाबदार असणार आहात. तुम्हालाच त्यांचे रक्षण करावे लागणार आहे. आता तरुण स्थिरावतात आणि एका अपत्यानंतर थांबतात. हे फारच समस्यापूर्ण आहे. मी तुम्हाला किमान चार मुले जन्माला घालावीत अशी विनंती करतो'', असे ते म्हणाले आहेत.

यानंतर त्यांनी चार मुले जन्माला घातलील अशा दांपत्यांना परशुराम बोर्डाकडून १ लाखांचे बक्षीस दिले जाईल असे जाहीर केले आहे. ''मी बोर्डाचा अध्यक्ष असो किंवा नसो, पुरस्कार दिला जाईल,'' असे त्यांनी स्पष्ट केले.

अनेक तरुणांनी आपल्याला आता शिक्षण फार महाग झाल्याचे सांगितले असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. ''कसे तरी तुम्ही हे शक्य केले पाहिजे. पण मुलांना जन्म घालताना अजिबात मागे राहू नका. अन्यथा देशात धर्मविरोधी लोकांची संख्या वाढत जाईल,'' असे विष्णी राजोरिया यांनी सांगितले आहे.

# पेन्टसच्या दुकानात काम करणाऱ्या चार नोकरांनीच केली चोरी; १२ लाख २२ हजारांचा मुद्देमाल जप्त

दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी :** दिनांक १२ जानेवारी रोजी बसस्थानक जालना रोडवरील अंबिका पेन्टचे दुकान फोडून चोरी करण्यात आली होती. दुकानात काम करणाऱ्या नोकरांनी चोरी केली या संशयावरुन दुकान मालकाने पोलिसांत तक्रार दाखल केली.

सदर फिर्यादीच्या अनुषंगाने पोलिसांनी गोपनीय बातमीदारामार्फत गुन्हा कोणी केला, गुन्ह्यातील चोरी केलेले सामान कुठे ठेवला आहे याबाबत तसेच संशयीत आरोपीबाबत माहिती घेतली. गोपनीय माहितीदारामार्फत पोलिसांना शेख आमेर ऊर्फ राजु




शेख अब्दुल रशीद यांने हा गुन्हा त्याचे साथीदार १) रिजवान खॉन एजाज खॉन २) योगेश महादु घाडगे ३) यश खरचने यांचे मदतीने केला असल्याची निष्पन्न झाले. रिजवान खॉन याचा शोध घेत असताना त्याच्या राहत्या घरी लालबाग येथे असल्याची माहिती मिळाल्याने त्याला त्याच्या घरातून अटक करण्यात आली.त्यांने प्रथम उडवा उडवीचे उत्तरे दिली त्यास अधिक विश्र्वासात घेवून विचारपुस केली असता त्यांने सदर गुन्हा हा त्याचे मित्र १) योगेश महादु घाडगे, २) शेख आमेर ऊर्फ राजु शेख अब्दुल रशीद ३) यश खरचणे याच्या मदतीने केल्याची कबुली दिली.

परंतु गुन्ह्यातील मुद्देमाल कोठे ठेवला याबाबत उडवाउडवीचे उत्तरे देत आसल्याने त्यांना अधिक विश्वासात घेवुन विचारपुस केली असता. त्यांनी पेन्ट गोडावुनच्या बनावट चावी बनवुन तीन ते चार वेळा चोरी केल्याची कबुली देवुन मुद्देमाल काढून देतो असे सांगितले. आज लालबाग येथील रिजवान खॉन एजाज खॉन याच्या ताब्यातून वेगवेगळ्या प्रकारच्या पेन्टच्या एकूण ४,५०,००० रुपयाचे २० लिटर वजनी ९६ बकेट, तसेच ६०,००० रुपयांच्या वेगवेगळ्या प्रकारच्या पेन्टच्या १० लिटर वजनी ३० बकेट तसेच वेगवेगळ्या प्रकारच्या पेन्टच्या १२,००० रुपयांच्या ४ लिटर वजनी १४ बकेट मिळुन आल्याने तसेच सदर गुन्हा करताना आरोपींनी वापरलेली गाडी देखील जप्त करण्यात आली आहे. एकूण १२,२२,००० रुपयांचा मुद्देमाल या प्रकरणात जप्त करण्यात आला आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# बदलापुरात मित्राचा मित्राच्या पत्नीवर अतिप्रसंग

# संतापलेल्या पतीने केली मित्राचा केला खून

दैनिक आपला विदर्भ

**कल्याण/प्रतिनिधी :** बदलापुरात एका नराधमाने त्याच्या मित्राच्या पत्नीवर अतिप्रसंग केला. तसंच ही बाब पतीला सांगितल्यास जीवे मारण्याची धमकी दिली. मात्र हे वारंवार घडू लागल्यानंतर पत्नीने पतीला याबाबतची माहिती दिली. यानंतर पतीने त्याच्या मित्राची डोक्यात हातोडी घालून हत्या केली आणि बाथरूममध्ये पडून त्याचा मृत्यू झाल्याचा बनाव रचला. मात्र पोस्टमॉर्टम रिपोर्टमध्ये या सगळ्याची पोलखोल झाल्यानंतर पोलिसांनी आरोपी पतीला बेड्या ठोकल्या आहेत.

बदलापूरच्या शिरगाव परिसरात राहणाऱ्या नरेश भगत आणि सुशांत यांची चांगली मैत्री होती. मात्र सुशांत याने नरेशच्या पत्नीवर अतिप्रसंग करत पतीला सांगितल्यास जीवे मारण्याची धमकी तिला दिली. यानंतर आणखी काही वेळा त्याने तिला धमकी देत तिच्यावर अतिप्रसंग केला. मात्र पत्नीने हिंमत करून नरेश याला सुशांतच्या या दुष्कृत्याची माहिती दिली. यानंतर नरेशने आपल्याला याबाबत काहीच माहिती नसल्याचं दाखवत १० जानेवारी रोजी सुशांतला घरी बोलावलं. तिथे दुपारी या दोघांनी मद्यपान केलं. त्या रात्री सुशांत हा नरेशच्याच घरी मुक्कामी राहिला. पहाटेच्या सुमारास नरेश याने सुशांतच्या डोक्यात हातोडी मारून त्याची हत्या केली आणि अति दारू प्यायल्याने बाथरूममध्ये पडून सुशांतच्या डोक्याला दुखापत झाली आणि त्याचा मृत्यू झाला, असा बनाव रचत पोलिसांना माहिती दिली. याप्रकरणी पोलिसांनी सुरुवातीला अकस्मात मृत्यूची नोंद केली. मात्र ज्यावेळेस सुशांत याच्या पोस्टमॉर्टमचे रिपोर्ट आले, त्यावेळेस नरेश याची पोलखोल झाली. कारण सुशांतचा मृत्यू अवजड वस्तूने डोक्यात प्रहार केल्यामुळे झाल्याचं पोस्टमॉर्टम रिपोर्टमध्ये नमूद करण्यात आलं होतं. यानंतर पोलिसांनी नरेश याला ताब्यात घेऊन पोलिसी खाक्या दाखवताच त्याने आपणच सुशांत याची हत्या केल्याची कबुली पोलिसांना दिली. आपल्या पत्नीसोबत दुष्कृत्य केल्याच्या रागातून त्याने सुशांतला मारल्याचं पोलिसांना सांगितलं. याप्रकरणी पोलिसांनी त्याच्या विरोधात हत्येचा गुन्हा दाखल करत त्याला बेड्या ठोकल्या आहेत.





## मंडणगडच्या शेणाळे घाटात दाभोळ मुंबई एसटीचा भीषण अपघात!

**रत्नागिरी/प्रतिनिधी :** मंडणगडच्या शेणाळे घाटात लालपरीचा भीषण अपघात झाल्याची धक्कादायक बातमी समोर आली आहे. ही बस रात्रीच्या सुमारास दाभोळवरून मुंबईच्या दिशेने येत होती. घाटातील उतारावरून जात असताना चालकाचे बस वरील नियंत्रण सुटून बस घरंगळत दरीत कोसळली. मात्र त्या ठिकाणी असलेल्या एका झाडामध्ये एसटी अडकली आणि त्यामुळे मोठे संकट दूर झाले. असे असले तरी या दुर्घटनेत ७ प्रवासी गंभीर जखमी असल्याची माहिती मिळाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार एसटी प्रवाशांना घेऊन मंडणगड शेणाळे घाटातून जात होती. या घाटात अति तीव्र वळण असल्याने यापैकी एका उतारातून जात असताना चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटले. आणि गाडी दरीच्या दिशेने घरंगळत गेली. दैव बलवत्तर म्हणून तिथे असलेल्या झाडझूडपांमध्ये अडकली. बस वेगाने जात असल्याचा प्रवाशांना अंदाज आल्याने प्रवाशांना जाग आली. आजूबाजूला असलेल्या नागरिकांनी हे दृश्य पाहून बचाव पथकाला कळवले. यानंतर बचाव पथकाने घटनास्थळी दाखल होऊन एसटीतील ४१ प्रवाशांना सुखरूप बाहेर काढले.

## राहुल गांधींनी २०१२ मध्ये केली पायाभरणी अन् मोदींकडून २०२५ मध्ये लोकार्पण!

दिल्ली,: पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज जम्मू-काश्मीरमधील गांदरबलमध्ये झेड मॉड बोगद्याचे लोकार्पण केले. श्रीनगर-लेह महाम ार्ग ञ-१ वर बांधलेला ६.४ किमी लांबीचा दुहेरी बोगदा श्रीनगरला सोनमर्गशी जोडेल. बोगद्याच्या बांधकामामुळे लोकांना सर्व हवाम ानात कनेक्टिव्हिटी मिळेल. राहुल गांधी यांनी २०१२ मध्ये या बोगद्याची पायाभरणी केली होती. बोगदा उघडल्याने काश्मीर खोऱ्यातील कनेक्टिव्हिटीला आणखी चालना मिळणार आहे. हा बोगदा श्रीनगर-सोनमार्ग मार्गावर आहे. या बोगद्याने, श्रीनगर-सोनमर्ग मार्गावरील रस्त्याचा भाग सर्व हंगामांसाठी खुला राहील आणि सोनमर्ग प्रदेशातील हिवाळी पर्यटनालाही चालना मिळेल.

बोगद्याचे उद्घाटन करताना पंतप्रधान म्हणाले, जम्मू-काश्म ीरच्या लडाखची आणखी एक जुनी मागणी आज पूर्ण झाली आहे. हे मोदी आहेत, ते आश्वासन देतात आणि ते पाळतात, यावर तुमचा विश्वास बसेल. प्रत्येक कामाची एक वेळ असते आणि योग्य काम योग्य वेळी होणारच असते. दुसरीकडे, राज्याचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला म्हणाले की, आशा आहे की जम्मू-काश्मीरला राज्याचा दर्जा देण्याचे आश्वासनही पूर्ण होईल. झेड मॉड बोगद्याच्या उद्घाटनानंतर श्रीनगर-लेह महामार्गावरील गगनगीर ते सोनमर्ग दरम्यानचे एक तासाचे अंतर आता १५ मिनिटांत कापले जाणार आहे. याशिवाय वाहनांचा वेगही ३० किमीतास वरून ७० किम ीतास होईल. पूर्वी हा दुर्गम डोंगराळ भाग पार करण्यासाठी ३ ते ४ तास लागत होते. आता हे अंतर अवघ्या ४५ मिनिटांत कापले जाणार आहे.

१२ वर्षात बोगदा बांधला, निवडणुकीमुळे उद्घाटन पुढे ढकलले

बोगदा प्रकल्प २०१२ मध्ये सुरू झाला. हा बोगदा प्रकल्प बॉर्डर रोड ऑर्गनायझेशनला देण्यात आला होता, मात्र नंतर हे काम खासगी कंपनीकडे देण्यात आले.

पीपीपी मॉडेल अंतर्गत बांधण्यात आलेला हा बोगदा ऑगस्ट २०२३ पर्यत सुरू होणार होता, परंतु कोरोनाच्या काळात बांधकामाला वेळ लागला.

जम्मू-काश्मीर विधानसभा निवडणुकीदरम्यान आचारसंहिता लागू करण्यात आली होती आणि त्याचे उद्घाटन आणखी काही दिवस पुढे ढकलण्यात आले होते. हा प्रकल्प पूर्ण होण्यासाठी एकूण १२ वर्षे लागली.

२७०० कोटी रुपयांच्या या प्रकल्पात बांधकाम सुरू करण्यापूर्वी भूसंपादन आणि पायाभूत सुविधांच्या नियोजनासाठी ३६ कोटी रुपये खर्च करण्यात आले.

हा बोगदा २६०० मीटर उंचीवर म्हणजेच समुद्रसपाटीपासून ५६५२ फूट उंचीवर बांधण्यात आला आहे. हा झेट आकार सध्याच्या रस्त्याच्या जवळपास ४०० मीटर खाली बांधला आहे.

डोंगर कोसळण्याचा किंवा हिम स्खलनाचा धोका नाही

हा बोगदा न्यू ऑस्ट्रियन टनेलिंग पद्धतीचा वापर करून तयार करण्यात आला आहे. या प्रक्रियेत बोगदा खोदण्याबरोबरच त्याचा म लबाही काढला जातो. ढिगारा काढून आतून मार्ग तयार केला जातो, त्याच पद्धतीने बोगद्याची भिंतही तयार केली आहे. त्यामुळे डोंगर कोसळण्याचा धोका टळतो. छअढच तंत्रात बोगद्याचे काम सुरू होण्यापूर्वी पर्वत, त्याच्या सभोवतालचे हवाम ान आणि मातीची तपासणी केली जाते. बोगद्याच्या प्रक्रियेत एकाच वेळी किती यंत्रसामग्री आणि किती लोक काम करू शकतील याचा अंदाज आहे, जेणेकरून डोंगराच्या पायथ्याला हानी पोहोचू नये आणि अपघाताची परिस्थिती उद्भवू नये.

## भिवंडी तालुक्यात महाराष्ट्र नवनिर्माण सेना महा कार्यकर्ता मेळावा संपन्न

दैनिक आपला विदर्भ

**भिवंडी/प्रतिनिधी :** भिवंडी तालुक्यातील पडघा येथे महाराष्ट्र नवनिर्माण सेना भिवंडी लोकसभा क्षेत्रात कार्यकर्ता मेळावा संपन्न झाला असून या मेळाव्यामध्ये भिवंडी तालुक्यातील मनसेचे अनेक कार्यकर्ते या मेळाव्यात उपस्थित होते यावेळी तेश्र :-मागील निवडणुकीत आम्हाला यश आले नाही सर्व पदाधिकाऱ्यांबरोबर बैठकी झाल्या भिवंडी असेल शहापूर असेल भिवंडी तालुका असेल या भागात कशी काम केली गेली पाहिजे येणाऱ्या महानगरपालिका निवडणुका पंचायत समिती निवडणुकीला मनसे पूर्ण ताकदीने सामोरे जाईल आहे. निवडणूक ही लोकांची नव्हती ही ईव्हीएम मशीनची होती आमच्या लोकांनी खूप काम जरी आम्हाला अपयशाला असेल तरी पुन्हा जोमाने उभे राहू आमच्या पाठीशी सन्माननीय राज ठाकरे ठाकरे या नावाची ताकद आहे या ठाकरे नावाच्या बळावर जिल्हा परिषद व पंचायत समिती मोटो यश मिळवू अशी आम्हाला अशी खात्री आहे. निवडणुकीमध्ये जर काही लोकांमध्ये नकारात्मक भावना तयार झाली असेल तर अशा माणसांनी आम्ही विनंती केली आहे की तुम्ही आमच्या सोबत व पक्षासोबत असाल तर संघटनेत जय पराजय होत असतात भारतीय जनता पक्षाने पराभव सहन केला आहे कॉंग्रेसने पराभव सहन केला आहे काही पराभव आम्ही देखील सहन केले आहेत आपण ज्या संघटनेत आहोत प्रचार प्रसार जबाबदारी महाराष्ट्र सैनिकाची व पदाधिकारी ची आहे अशा परिस्थितीत पक्षाबद्दल किंवा पदाधिकाऱ्यांबद्दल निगेटिव्ह पण आप पसरवत असेल तुम्ही वेगळे राहिले तरी चालेल भूमिका होती पण आमचे सर्व पदाधिकारी सन्माननीय राज ठाकरे सोबत आहेत प्रामाणिक आहेत प्रचार व प्रसार करतील अशी प्रतिक्रिया अविनाश जाधव यांनी दिली आहे.




## भारतीय हवामान विभागाच्या १५० व्या स्थापना दिनाच्या समारंभात पंतप्रधान सहभागी होणार

नवी दिल्ली,: पंतप्रधान नरेंद्र मोदी १४जानेवारी रोजी सकाळी १०.३० वाजण्याच्या सुमारास नवी दिल्लीतील भारत मंडपम इथे भारतीय हवामान विभागाच्या १५व्या स्थापना दिनाच्या समारंभात सहभागी होतील. ते तिथे उपस्थितांना संबोधित देखील करतील.



भारताला हवामान व वातावरण प्रति सजग देश बनवण्याच्या उद्दिष्टासाठी पंतप्रधान मिशन मौसम चे उद्घाटन करतील. अत्याधुनिक हवामानवेधी तंत्रज्ञान व प्रणालींचा विकास, उच्च रिझोल्युशनची वातावरणीय निरीक्षणे नोंदवणे, अत्याधुनिक रडार व उपग्रह तसेच उच्च कार्यक्षमतेचे संगणक तयार करणे ही या मि शनची उद्दिष्टे आहेत. हवामानाचे व वातावरणातील प्रक्रियांचे आकलन सुधारणे तसेच हवेच्या गुणवत्तेबद्दल आकडेवारी गोळा करून त्यावर आधारित हवामान व्यवस्थापन धोरण आखून त्यात सकारात्मक बदल घडवण्यासाठी काम करण्यावर हे मिशन अधिक भर देणार आहे.

हवामान बदलाप्रति लवचिकता वाढवण्यासाठी भारतीय हवामान विभागाने तयार केलेल्या आयएमडी व्हिजन -२०४७ या पत्रकाचे पंतप्रधान अनावरण करतील. त्यात हवामान अंदाज, हवामान व्यवस्थापन व हवामान बदलाचे शमन यासाठीच्या योजनांचा समावेश आहे.

भारतीय हवामान विभागाचा १५०वा स्थापना दिन साजरा करण्यासाठी अनेक कार्यक्रम व कार्यशाळा आयोजित केल्या असून त्यातून हवामान विभागाच्या गेल्या दीडशे वर्षातील अनेक उपलब्धी सादर केल्या जातील. देशातील सर्व शासकीय संस्थांनी हवामानासंबंधित पुरवलेल्या अनेक सेवांची भारताला हवामान सजग बनवण्यात बजावलेली भूमिका सर्वासमोर येऊ शकेल.

# फखरूद्दीन अली अहमद उर्दू हाइस्कूल विज्ञान प्रदर्शन मध्ये प्रथम क्रमांक

दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी :** दि.२ व ३ जानेवारी २०२५ रोजी भारतीय ज्ञानपीठ मेहकर येथे आयोजीत केलेल्या तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनी मध्ये फखरोद्दीन अली, अहमद उर्दू हाइस्कूल मधून असलम खान ( ङ.-. )व सैफुल इस्लाम सर ,सरवर सर, व विद्यार्थी असे ४ मोडेल तालुका विज्ञान प्रदर्शन मध्ये सहभाग घेतला होता सैफुल इस्लाम सर यांचा तीसरा क्रमांक आला असून असलम खान यांनी बाजी मारून प्रथम क्रमांक पटकविला.

असलम खान यांनी स्वनिर्मीती शैक्षणीक साहित्य हे मॉडेल तयार केले होते यामध्ये केमीस्ट्री, फिजिक्स, बायोलॉजी व गणीत यावर आधारीत होते हे मॉडेल परिक्षक मंडळीना आवडले असून त्यानी असलम खान यांना बरेच प्रश्र्न विचारून अनेक प्रश्र्नांची उत्तरे दिली असून त्यानी ङ.- गटामधुन प्रथम क्रमांक पटकविला असून मॉडेलची जिल्हास्तरावर नीवड झाली.

हे प्रथम क्रमांकाचे पुरस्कार घेउन फ. अ.अ.उर्दू हाइस्कूलचे नाव जिल्हास्त्रावर पोहचले असून या प्रदर्शनीला मेहकर मतदारसंघाचे आमदार सिद्धार्थ खरात साहेब यानी सुद्धा असलम खान याना पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार केला असुन प्रयोगाची प्रशंशा केली, हे पुरस्कार केंद्रप्रमुख रायमुलकर साहेब यांचा हस्ते व मा. प्राचार्य सोहेल सर (फ.अ.अ. उर्दू हाईस्कूल ) इलियास सर, जुलकरनैन सर ,व पाटिल सर , एम .के परसुवाले , व एम. आर वानखेड़े (गटशिक्षणाधिकारी मेहकर) या मान्यवारांचे हस्ते पुरस्कार देऊन असलम खान यांचा जोरदार शील्ड व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला.



मान्यवारांचे हस्ते पुरस्कार स्वीकारतांना असलम खान

## महत्त्वाचे...

### डोंबिवलीत मानपाडा पोलिसांनी गांजा तस्करी करणाऱ्या तरुणाला ठोकल्या बेड्या



दैनिक आपला विदर्भ

**कल्याण/प्रतिनिधी :** कल्याण डोंबिवली परिसरात अंमली पदार्थ तस्करी करणाऱ्यांविरोधात पोलिसांनी कारवाई केली आहे. डोंबिवली मानपाडा पोलिसांनी गस्ती दरम्यान गांजा विकण्याचा प्रयत्नात असणाऱ्या एका तरुणाला बेड्या ठोकल्या आहेत. कल्याण पूर्व टाटा नाका परिसरात त्याला सापळा रचत अटक केली आहे. पप्पू राठोड असे या गांजा तस्करी करणाऱ्या तरुणाचे नाव आहे. त्याचे वडील देखील गांजा विक्री करत असल्याची माहिती पोलीस तपासात समोर आली आहे. पप्पू राठोड विरोधात या आधी देखील गांजा विक्री बाबतचे गुन्हे दाखल असून पुढील तपास मानपाडा पोलीस करत आहेत.

### गौण खनिज परवानगी रद्द करा या मागणीसाठी मौजे नायगांव येथील शेतकऱ्यांचे उपोषण




दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** मौजे नायगांव तालुक्यातील शेतकरी या भागातील सरकारी जमीन गट नं .१०७ मधील गौण खनिज परवानगी रद्द करणे या मागणीसाठी विभागीय आयुक्त कार्यालयासमोर उपोषण सुरू केले आहे. जर या खदानी चालू झाल्या तर त्या शेजारी शेती करणाऱ्या शेतकऱ्यांवर बोर ब्लास्टमुळे उपासमारीची वेळ येणार आहे, तसेच आरोग्याच्या देखील वेगवेगळ्या समस्या उद्भवणार आहेत त्यामुळे या खदाणींची परवानगी रद्द करावी अशी मागणी येथील उपोषणकर्त्या शेतकऱ्यांनी केली आहे.

### दोन सराईत बाईक चोरट्यांना अटक; मानपाडा पोलिसांची कारवाई




दैनिक आपला विदर्भ

**कल्याण/प्रतिनिधी :** कल्याण,डोंबिवली, नवी मुंबई परिसरात दुचाकी चोरणाऱ्या दोन चोरट्यांना मानपाडा पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. रितिक बाविस्कर, कुणाल नायडू अशी या दोन चोरट्यांची नावे आहेत. दुचाकी चोरीच्या गुन्ह्यांचा तपास करताना मानपाडा पोलिसांना या दोघांची माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे सापळा रचत दोघांना उल्हासनगर येथून अटक करण्यात आली. या दोघांकडून आतापर्यंत चार गुन्ह्यांची उकल करत चार दुचाकी हस्तगत करण्यात पोलिसांना यश आलं आहे.

### पाठवायचे होते २२००, उडाले १० लाख, तातडीनं घेतली बँकेत धाव

नवी दिल्ली,: आता पूर्वीसारखा भरलेला खिसा घेऊन प्रवास करावा लागत नाही, त्यामुळे पैसे हरवण्याची, चोरी होण्याची भिती नसते. आता दिवसभरातील खर्च मोबाईलवरूनच होतात. हे जेवढं सोयीचं आहे, तेवढंच सतर्कतेनं करण्याचंही काम आहे. कारण कधी जर चुकून एक आकडा जास्त दाबला गेला तर आपण आपले पैसे गमावून बसू शकतो. त्यात सायबर गुन्हेगारीत सध्या प्रचंड वाढ झालीये. एका व्यक्तीनं छोट्याशा ऑनलाइन ट्रान्झॅक्शनदरम्यान चक्क आपले १० लाख १० हजार रुपये गमावले. नेमकं घडलं काय, सविस्तरपणे जाणून घेऊया.

भूपिंदर सिंह यांच्यासोबत हा धक्कादायक प्रकार घडला. त्यांना एका व्यक्तीला २२०० रुपये ऑनलाइन ट्रान्सफर करायचे होते. त्यांनी नेहमीप्रमाणे ट्रान्झॅक्शन करायला सुरुवात केली. परंतु पैसे काही जातच नव्हते. तेव्हा त्यांच्या लक्षात आलं की, त्यांचं स्वत:चंच पूर्ण खातं खाली झालंय. ट्रान्झॅक्शन करण्याइतपत पैसेही त्यांच्या खात्यात शिल्लक नव्हते. हे सगळं कळल्यावर भूपिंदर यांच्या पायाखालची जमीनच सरकली. खात्यातले १० लाख १० हजार रुपये अचानक उडाले हे कळल्यावर कोणालाही धडकीच भरेल.

भूपिंदर यांनी पुन्हा पुन्हा व्यवस्थित तपासलं. आपण काही चुकीचं बघत नाही आहोत ना याचीही शहानिशा केली. त्यानंतर कळलं की, त्यांच्या खात्यातून २ वेळा ५-५ लाख रुपयांचे ट्रान्झॅक्शन झाले होते. एकदा १० हजार रुपयेही पाठवले होते. मग आपल्यासोबत फार मोठा घोटाळा झालाय, आपली मोठी फसवणूक झालीये हे भूपिंदर यांच्या लक्षात आलं. त्यांनी ताबडतोब याविरोधात सायबर क्राइम आणि बँकेत तक्रार दाखल केली.

# आरोग्य सेवा शेवटच्या घटकापर्यंत पोचविण्यासाठी केंद्र व राज्य शासन कटिबद्ध - प्रतापराव जाधव

## राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त सिंदखेडराजा व सवणा येथील मोफत आरोग्य रोगनिदान शिबिराचा गरजूंनी घेतला लाभ !






दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** गोरगरीब जनतेला चांगली आरोग्य सेवा मिळाली पाहिजे, त्यांच्यावरही चांगले उपचार झाले पाहिजे यासाठी केंद्र आणि राज्य शासनाच्या वतीने आयुष्यमान भारत योजना संपूर्ण देशामध्ये राबवली जात आहे. या योजनेचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचण्याचं काम हे सरकारच्या माध्यमातून केल्या जात आहे, असे प्रतिपादन केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केले.

राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीचे औचित्य साधून जिल्ह्यातील सिंदखेड राजा आणि चिखली तालुक्यातील सवणा येथे मोफत आरोग्य तपासणी व रोगनिदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या दोन्ही आरोग्य शिबिराचे उद्घाटन केंद्रीय आयुष, आरोग्य व कुटूंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते झाले. त्यावेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते. सिंदखेड राजा येथील आरोग्य शिबिरात माजी आमदार शशिकांत खेडेकर, जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील, उपविभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे, तहसिलदार, मुख्याधिकारी आदी मान्यवर उपस्थित होते.

तर सवणा येथील आरोग्य शिबीराच्या उद्घाटन प्रसंगी केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव, मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस यांचे खाजगी सचिव विद्याधर महाले, गजानन मोरे, शिवाजीराव देशमुख, विलास घोलप, नियोजन समिती अध्यक्ष कैलास भालेकर, माजी.जि.प.सदस्य शरद हाडे, संजय भुतेकर उपस्थित होते.

यावेळी शिबीरार्थींना मार्गदर्शन करतांना केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव म्हणाले की, या देशातील गोरगरीब जनतेला त्यांच्याच भागामध्ये चांगल्या प्रकारची आरोग्य सुविधा कशाप्रकारे मिळेल या दृष्टिकोनातून राज्य शासनाकडून प्रयत्न करत असल्याचे त्यांनी सांगितले. देशातील आणि राज्यातील आरोग्याची सेवा सक्षम करून लोकांना सहज उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र आणि राज्यातील राज्य शासन कटिबध्द आहे. गोरगरीब जनतेला महानगरातील हॉस्पिटलमध्येही आरोग्य उपचार घेता यावा यासाठी केंद्र आणि राज्य शासनाच्या वतीने आयुष्यमान भारत योजना राबविली जात आहे. या योजनेचा सर्वसामान्य जनतेने लाभ घ्यावा, असे आवाहन श्री. जाधव यांनी केले.

या शिबीरामध्ये अस्थिरोग तज्ञ, कान नाक घसा, मूत्रपिंड व मूत्रमार्ग विकार तज्ञ, कर्करोग तज्ञ, बालरोग तज्ञ, पोटविकार तज्ञ, मानसिक आजार तज्ञ, हृदयरोग तज्ञ, मेंदु तपासणी तज्ञ डॉक्टरांकडून करण्यात आली. याशिवाय नेत्र तपासणी, मोफत चष्मे आणि औषधीचे वाटप करण्यात आले. या शिबिरात अनेक गरजूंनी मोठ्या संख्येने सहभागी होवून आरोग्य सेवेचा लाभ घेतला.

## केंद्रिय मंत्री प्रतापराव जाधव यांनी निर्देशीत केल्याप्रमाणे आयुष मंत्रालयाच्या होमीओपॅथी आयुर्वेद, युनानी च्या पथकाने केस गळती रुग्णांशी साधला संवाद

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** केस गळती व टक्कल आजारावर संशोधन करण्याच्या दृष्टीकोनातुन केंद्रीय आयुष मंत्रालयाचे पथक जिल्हयात दाखल झाले असुन त्यांनी टक्कल ग्रस्त गावातील रुगणांशी हितगुच करुन माहिती संकलीत करण्याचे काम करत आहे. तर भारतीय वैद्यकिय संशोधन परिषद अर्थात खउचठ च्या शास्त्रज्ञांचे दिल्ली आणि चेन्नई चे पथक आज दाखल होणार आहे.

बुलढाणा जिल्हयातील शेगांव तालुका अंतर्गत येणाऱ्या पहुरजिरा, कालवड, कठोरा, भोनगांव, बोंडगांव यांसह ११ गांवामध्ये नागरीकांचे केस गळती होऊन टक्कल पडत असल्याची समस्या निर्माण झाली होती. या गावांना ११ जानेवारी रोजी केंद्रीय आयुष आरोग्य व कुटूंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी भेट देऊन बाधीत रुग्णांना धिर देत या विचीत्र आजाराच्या संशोधनासाठी आयुष आणि भारतीय वैद्यकिय संशोधन परिषदेची टिमला आदेशीत केले होते. १३ जानेवारीला आयुष मंत्रालया अंतर्गत येणाऱ्या प्रादेशिक होमीओपॅथी संशोधन संस्था नवि दिल्ली आणि केंद्रिय होमीओ परिषदेची शास्त्रज्ञाची टिम शेगांव तालुक्यात दाखल झाली आहे.

यामध्ये युनानी होमीओपॅथी आणि आयुर्वेदीकचे तज्ञांचा समावेश असुन डॉ.हिंकल कौर, डॉ.प्रियंका सुर्यवंशी, डॉ.तेजस्वीनी पाटोळे यांच्या मार्गदर्शनाखाली केस गळती गावातील रुग्णांशी चर्चा करुन माहिती संकलीत करीता आहे. दरम्यान राज्याचे आरोग्य उपसंचालक डॉ.भंडारी, सहाय्यक संचालक डॉ.आर. पी.पुलवार यांनी केस गळती गावांना भेटी देऊन रुग्णांशी संवाद साधला. या आजाराविषयी घाबरुन न जाता आरोग्य विभागाच्या पथकांना सहकार्य करण्याचे आवाहन केले.

### ICMR च्या शास्त्रज्ञांचा चमुही आज शेगांव येथे होणार दाखल

### ICMR चे पथक आज होणार दाखल

भारतीय वैद्यकिय संशोधन परिषद अर्थात ICMR दिल्ली आणि चेन्नई चे पथक आज १४ जानेवारी रोजी जिल्हयातील शेगांव येथे दाखल होणार आहे. या पथकामधील तज्ञ संशोधलक केस गळती भागातील बाधीत रुग्णांशी संवाद साधुन हा प्रकार कशामुळे झाला. त्याच मुळ शोधुन प्रादुर्भाव रोखण्याचे दृष्टीने काम करणार आहे. या विशेष पथकामध्ये डॉ.मनोज मुऱ्हेकर (ICMR–नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ एपिडेमियोलॉजी, चेन्नई) , डॉ. सोमेश गुप्ता (एम्स, नवी दिल्ली), डॉ सुमित अग्रवाल (ICMR, नवी दिल्ली), डॉ. शीला गोडबोले (ICMR–नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ ट्रान्सलेशनल व्हायरोलॉजी, पुणे) ,डॉ राज तिवारी (ICMR–नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ रिसर्च इन एन्व्हायर्नमेंटल हेल्थ, भोपाळ) , डॉ सुचित कांबळे (ICMR–नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ ट्रान्सलेशनल व्हायरोलॉजी, पुणे) यांचा या विशेष पथकामध्य यांचा समावेश आहे.

## संत ज्ञानेश्वर मागासवर्गीय मुलांचे वसतिगृहातील घटनेची आयोगाकडून गंभीर दखल

### अनुसूचित जाती जमाती आयोगाचे उपाध्यक्ष धर्मपाल मेश्राम यांची वसतीगृहाला भेट

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** येथील संत ज्ञानेश्वर मागासवर्गीय मुलांच्या वसतिगृहात काही दिवसापूर्वी घडलेल्या अनुचित प्रकाराची दखल अनुसूचित जाती जमाती आयोगाने घेतली असून त्याअनुषंगाने आयोगाचे उपाध्यक्ष धर्मपाल मेश्राम हे सोमवारी बुलढाणा जिल्हा दौऱ्यावर आले होते. यावेळी त्यांनी संत ज्ञानेश्वर मागासवर्गीय मुलांच्या वसतिगृहाला भेट दिली.

भेटीदरम्यान वसतिगृह व शाळेची पाहणी करुन तेथील सुधारणाविषयी सूचना केल्या. यामध्ये वसतिगृहातील दस्तावेजाचे अद्यावतीकरण, पिण्याचे पाणी, शौचालयातील सुविधा, बेडची व्यवस्था, टिनशेड आदी पायाभुत सुविधा तातडीने पुरविण्याचे निर्देश उपाध्यक्ष धर्मपाल मेश्राम यांनी जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी व शिक्षणाधिकारी यांना दिल्याचे त्यांनी सांगितले.

बुलढाणा नगरपालिकेतील विविध विषयांचा घेतला आढावा

दरम्यान बुलढाणा नगरपरिषदेतील कामकाजाचा आढावा घेताना आयोगाचे उपाध्यक्ष श्री. मेश्राम यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी सुधार योजनेचा आढावा घेतला. या योजनेतून दोन वाचलनालयामध्ये एका आर्थिक वर्षात कोट्यवधी रुपयांचे पुस्तके खरेदी केल्याचे निर्देशनास आले असल्याचे त्यांनी सांगितले. या प्रकरणाची समाजकल्याण अमरावती विभागाचे उपायुक्त यांनी स्व:त चौकशी करुन तपशिलवार अहवाल १५ दिवसात सादर करण्याचे सूचना दिल्याची माहिती आयोगाचे उपाध्यक्ष श्री. मेश्राम यांनी दिली.

नगरपालिकांतर्गत अनुसूचित जातीच्या वर्गासाठी असलेल्या निधीचा विनियोगाचा अपव्यय होत असल्याचे आढळून आले. तसेच स्मशानभुमीच्या कामातील अनियमिततेची चौकशी सहायक आयुक्त समाजकल्याण व बुलढाणा नगरपालिका मुख्यधिकारी यांनी तातडीने करुन अहवाल सादर करण्याचे निर्देश उपाध्यक्ष धर्मपाल मेश्राम यांनी दिले.

## जिल्हाधिकाऱ्यांची महसूल कर्मचाऱ्यास हिंदीतून शिवीगाळ; मंत्री उदय सामंतांसह संघटनेकडे लेखी तक्रार

**रत्नागिरी/प्रतिनिधी :** रत्नागिरी जिल्ह्याचे जिल्हाधिकारी देवेंद्रसिंग यांच्या बाबतीत असलेली नाराजी आणि तक्रार आता पुढे आली आहे. जिल्हाधिकारी यांनी महसूल विभागातील एका अधिकाऱ्याला खालच्या भाषेत आणि अर्वाच्य शब्द वापरून शिवीगाळ केली. याबाबत संबंधित अधिकाऱ्याने थेट उद्योगमंत्री उदय सामंत यांच्याकडे तक्रार केली आहे. त्याबाबतचं निवेदन उदय सामंत यांना दिल्याचं त्यांनी सांगितलं आहे. याशिवाय महसूल कर्मचारी संघटनेला देखील त्यांनी याबाबतचा अर्ज दिला आहे. त्यामुळे जिल्हाधिकारी यांच्या विरोधात काय कारवाई केली जाणार? जिल्हाधिकारी यांनी शिव्या देण्याचं नेमकं कारण काय? असा सवाल सध्या कर्मचारी वर्गाकडून विचारला जात आहे. जिल्हाधिकारी यांच्या या वागणुकीला कर्मचारी वैतागले होते, खासगीमध्ये याबाबतच्या तक्रारी आणि चर्चा होत होत्या. पण जिल्हाधिकारी यांच्या विरोधात आता कर्मचार्याने थेट लेखी तक्रार दाखल केल्याने कर्मचाऱ्यांचा आवाज बुलंद झाल्याचं पाहायला मिळत आहे.

# शेगांव येथे राष्ट्रीय युवा दिनानिमित्त १०८ सामूहिक सूर्यनमस्कार कार्यक्रम संपन्न

दैनिक आपला विदर्भ





**बुलढाणा/प्रतिनिधी :** राष्ट्रीय युवा दिनानिमित्त दि.१२ जानेवारी रोजी मथुरा लॉन्स शेगाव येथे १०८ सामूहिक सूर्यनमस्काराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी स्वयंसेवी संस्था, नागरिक व विद्यार्थ्यांनी सामूहिक सूर्यनमस्कार कार्यक्रमात स्वयंस्फुर्तीने सहभागी झाले होते.

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, जिल्हा क्रीडा अधिकारी व जिल्हा क्रीडा परिषद बुलढाणा तसेच कस्तुराई बहुउद्देशीय संस्था, पतंजली परिवार शेगाव जायंट्स ग्रुप शेगाव यांच्या संयुक्त सामूहिक सूर्यनमस्काराचे आयोजन करण्यात आले होते. भारत स्वाभिमान प्रांत सह कोषाध्यक्ष पी. आर. सुलताने यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करून राष्ट्रीय युवा दिनाचे महत्त्व सांगितले. कस्तुराई बहुउद्देशीय संस्थेच्या अध्यक्ष व योग शिक्षीका कालिंदी असंबे यांनी बालयोग साधक, युवा योग साधक, साधिका व विद्यार्थ्यांकडून १०८ सूर्यनमस्कार करून घेतले.

कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन करुन दिप प्रज्वलनाने झाली. यावेळी शहर पोलीस स्टेशनचे ठाणेदार नितीन पाटील, पतंजली जिल्हा प्रभारी चतुर्भजी मिटकरी, महिला पतंजली जिल्हाध्यक्ष श्रीमती चांडक, पतंजली कृषी सह कोषाध्यक्ष निळकंजी साबळे, जायंट्स फेडरेशन अध्यक्ष व मथुरा लॉन्सचे संचालक विनायक भारंबे, जिल्हा क्रीडा अधिकारी बी.एस.महानकर उपस्थित होते.

नवोदय विद्यालय, चिन्मय विद्यालय स्वामी विवेकानंद शाळा, गो ग्रीन संस्थेचे सदस्य, लावण्या योगा क्लासेसच्या सर्व योगसाधिका, विद्यार्थ्यांचे पालक वर्ग व शेगाव मधील इतर योगप्रेमींनी मोठ्या प्रमाणात १०८ सूर्यनमस्कार मध्ये सहभाग घेतला. लावण्या योगा क्लासेसच्या वैष्णवी उमाळे, हर्षदा बैतुले, स्वाती गोल्हर, मेधा कुलकर्णी, प्रणिता कऱ्हे, ज्योती धुमाडे, विना लाखे, रूपाली राहटे, योगिता शेंडे, संगीता खेडकर, विद्या नारखेडे, टाले मॅडम या महिलांनी सुद्धा १०८ सूर्य नमस्कार घालून शारीरिकरित्या तंदुरुस्त असल्याची प्रेरणा दिली. सूर्यनमस्कार काढलेल्या सर्व योग साधकांना प्रमाणपत्राचे वाटप जिल्हा क्रीडा अधिकारी,बी.एस. महानकर व ठाणेदार नितीनजी पाटील यांच्या हस्ते देऊन योग साधकांना सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्रो ग्रीन फाउंडेशन सदस्य विठ्ठल जी मिरगे यांनी तर आभार प्रदर्शन विनाय भारंबे यांनी केले. कार्यक्रमाकरिता पतंजली परिवार शेगाव जायंट्स ग्रुप व कस्तुराई बहुउद्देशीय संस्था शेगाव व क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

## विविध वृत्त...

### यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्:मय पुरस्कारासाठी प्रवेशिका पाठविण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्:मय पुरस्कार योजनेतंर्गत निवडअंती सन २०२४ चे राज्य वाङ्:मय पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. या पुरस्कारासाठी दि. १ जानेवारी ते ३१ डिसेंबर २०२४ या कालावधीत प्रकाशित झालेल्या प्रथम आवृत्ती पुस्तकासह दि. ३१ जानेवारी २०२५ पर्यंत प्रवेशिका मागविण्यात आल्या आहेत. या पुरस्कारासाठी इच्छुकांनी प्रवेशिका पाठविण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनामार्फत करण्यात आले आहे.

पुरस्कार नियमावलीनुसार पात्र लेखक, प्रकाशक यांना या योजनेत भाग घ्यावयाचा असल्यास त्यांनी प्रत्येक प्रवेशिका प्रपत्रासोबत आपल्या पुस्तकांच्या दोन प्रती विहित नमुन्यातील अर्जासह स्थानिक निधी शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा येथे सादर करावे, असे आवाहन तहसिलदार यांनी केले आहे.

### शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी भारतीय किसान संघाचे एक दिवसीय धरणे आंदोलन



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** राज्य सरकारने सरसकट दुष्काळ घोषित करून आर्थिक मदत द्यावी, पिक विमा मधील अटी दूर करून पीक विमा त्वरित देण्यात यावा,वैनगंगा ते नळगंगा हा प्रकल्प पैनगंगा नदीपर्यंत न्यावा आणि शेतकऱ्यांना सन्मान निधी वीस हजार पर्यंत करावा आणि वन्य प्राण्यांपासून पिकांचे होणारे नुकसानीची भरपाई देण्यात यावी यासह अन्य मागण्यांसाठी आज भारतीय किसान संघटनेच्या वतीने बुलढाणा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एक दिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले आहे.

### नाफेड अंतर्गत सोयाबीन खरेदीला मुदतवाढ द्यावी यासाठी शिवसेना ठाकरे गटाची शेतकऱ्यांसह तहसील कार्यालयावर धडक



दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी :** नाफेड अंतर्गत सोयाबीन खरेदी बंद झाली असून तात्काळ खरेदीला मुदतवाढ द्या या मागणीसाठी शिवसेना ठाकरे गटाच्या वतीने नांदगाव खंडेश्र्वर तहसील कार्यालयावर धडक देण्यात आली. नाफेड मार्फत हमीभावाने खरेदी करण्यात येत असलेल्या सोयाबीन खरेदीची मुदत १२ जानेवारी रोजी संपली असून शासनाने खरेदी बंद केली मात्र ऑनलाइन नोंदणी न झालेल्या ४००० हजाराच्या वर तालुक्यातील शेतकऱ्यांचे सोयाबीन खरेदी करणे बाकी आहे. हमीभाव आणि बाजार भावात प्रति क्विंटल १ हजाराच्या वर तफावत असल्याने शेतकऱ्यांचे प्रचंड आर्थिक नुकसान होणार आहे त्यामुळे शेतकरी चिंतेत सापडला असून शेतकऱ्यांचे खरेदी विक्री संस्थेकडे प्राप्त झालेल्या अर्जाची ऑनलाइन नोंदणीला व सोयाबीन खरेदीला सुद्धा मुदतवाढ देण्यात यावी, ६ जानेवारी अर्जाची ऑनलाइन नोंदणी करण्याची अंतिम मुदत होती परंतु मुदतीच्या आत खरेदी विक्री संस्थेकडे प्राप्त झालेल्या अर्जाची ऑनलाइन नोंदणी झाली नाही त्यात शेतकऱ्यांचा दोष नाही त्यामुळे सोयाबीन खरेदीची व ऑनलाइन नोंदणीची तारीख वाढवण्यात यावे अशी मागणी करत भाजप सरकार विरोधात प्रचंड नारेबाजी करून शिवसेना ठाकरे गटाने शेतकऱ्यांनसह तहसील कार्यालयावर धडक दिली आहे

### ठाण्यातील नामांकित हॉटेलला आग!; आगीच्या धुरात श्वास कोंडल्याने मांजरीचा मृत्यू

**ठाणे/प्रतिनिधी :** ठाण्यातील नामांकित हॉटेलला भीषण आग लागल्याची धक्कादायक बातमी समोर आली आहे. या घटनेत कोणतीही जीवित हानी झाली नसली तरी मोठ्या प्रमाणावर वित्त हानी झाली आहे. आग लागल्याने हॉटेल जळून खाक झाले आहे. सुमारे एक तासानंतर आग आटोक्यात आणण्यात आली गेली. आज सकाळी ६.१५ वाजता उपवन तलावाजवळील बॉम्बे डक हॉटेलमध्ये भीषण आग लागली.या घटनेची माहिती मिळताच स्थानिक अग्निशमन कर्मचारी आणि प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापन पथक घटनास्थळी दाखल झाले. सुमारे एक तासानंतर म्हणजेच सकाळी ७.४५ वाजताच्या सुमारास अग्निशमन दलाच्या पथकाला आग विझवण्यात यश आलं. या दुर्घटनेत कोणतीही जीवित हानी झाली नाही. मात्र आगीच्या तीव्रतेने धुरांचे लोट वाहू लागले.